<u>संकेतस्थळासंदर्भात नेहमी विचारले जाणारे अतिरिक्त प्रश्न</u>

१. **ऑनलाईन अर्जासोबत अपलोड करावयाच्या कागदपत्र / दस्तऐवजाच्या आकाराची काही मर्यादा आहे काय व ते कोणत्या फॉरमॅटमध्ये असावे** ?

उत्तर : अपलोड करावयाच्या कागदपत्रांचा / दस्तऐवजांचा आकार जास्तीत जास्त १ एम बी च्या मर्यादेत असेल व ते पीडीएफ फॉरमॅटमध्ये अपलोड करावे लागेल.

**२. प्रतिज्ञापत्राचा विहित नमूना-ब मला कोठे मिळू शकेल** ?

उत्तर : नमूना-ब मधील प्रतिज्ञापत्राचा नमूना महाराष्ट्र स्थावर संपदा (विनियमन व विकास) (स्थावर संपदा प्रकल्पाची नोंदणी, स्थावर संपदा अभिकर्त्याची नोंदणी व्याजदर आणि संकेतस्थळावर त्याचे प्रकटन) नियम, २०१७ अंतर्गत महारेराच्या संकेतस्थळावर (website https://maharera.mahaonline.gov.in) उपलब्ध आहे. सदर नमूना-ब मधील प्रतिज्ञापत्र रुपये १००/- च्या मुद्रांकावर (Stamp Paper) आणि साक्षांकित (Notorised ) केले असणे आवश्यक आहे.

३. **विहित प्रमाणपत्रांचे नमूने जसे (नमूना १, नमूना २, नमूना ३, नमूना ४ आणि नमूना ५ इत्यादी) मला कोठे मिळू शकतील** ?

उत्तर : उपरोक्त प्रमाणपत्रांचे विहित नमूने महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (सर्वसाधारण) विनियम २०१७ मध्ये समाविष्ट केले आहेत. ते महारेराच्या संकेतस्थळावरुन (website https://maharera.mahaonline.gov.in) उपलब्ध करुन घेऊ शकता.

४. **ऑनलाईन नोंदणी करताना, प्रकल्पावर कोणत्या प्रकारचा भार / बोजा आहे काय याबाबतचे प्रमाणपत्र देणे अनिवार्य आहे. माझ्या प्रकल्पावर कोणत्याही प्रकारचा भार नाही, तर मी काय अपलोड करावे** ?

उत्तर : जर प्रकल्पावर कोणत्याही प्रकारचा भार / बोजा नसेल तर प्रवर्तकाने लेटरहेडवर, स्वत:च्या स्वाक्षरीने तसेच स्वयं घोषित प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

**५. संकेतस्थळावर नोंदणी करताना पॅन कार्डची प्रत जोडणे अनिवार्य आहे. आम्ही कोणाच्या पॅनकार्डची प्रत अपलोड करणे आवश्यक आहे** ?

उत्तर : वैयक्तिक प्रकल्पासाठी प्रवर्तकाने त्याचे वैयक्तिक पॅन कार्ड अपलोड करणे आवश्यक आहे. जो प्रकल्प संस्था (जसे कंपनी मार्फत, संयुक्त भागीदारी इत्यादी) विकसीत करीत आहे अशा प्रकरणामध्ये अर्जदार संस्थेचे पॅनकार्ड अपलोड करणे अनिवार्य आहे.

-----

**अस्विकाहार्य**

या ठिकाणी अभिव्यक्त करण्यात आलेला दृष्टिकोण सचिवालयाचा आहे आणि तो महारेरा प्राधिकरणाचा असणे आवश्यक नाही.

आमचा प्रतिसाद हा केवळ उपलब्ध केलेल्या आधारावर व आमच्या आकलनशक्तीनुसार आहे. आम्ही असे गृहित धरले आहे की, आपणांस प्रतिसाद देण्याच्या उद्देशाने, आम्हास उपलब्ध करुन दिलेली वस्तूस्थिती अचूक व बरोबर आहे. काही फरक किंवा वस्तुस्थितीमध्ये चुकीचा अर्थ, गृहितके आणि अभिवेदने यांचा विपरीत परिणाम आमच्या प्रतिसादातील निष्कर्षावर होऊ शकतो.

यापुढे असेही की, आमचा प्रतिसाद हा स्थावर संपदा (विनियम व विकास) अधिनियम, २०१६ आणि नियम व विनियमामध्ये उल्लेखिलेल्या तरतूदींशी संबंधात अन्वयार्थानुसार असेल.

-----